# संगीतातील घराणी

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी – दैनिक महाराष्ट्र टाईम्स, संपा. द्वा भ कर्णिक, मुंबई, ०१ ऑक्टोबर, १९६७)

अभिरुचीनियंत्रक संस्थांपैकी गुरु या संस्थेचा व तिच्या स्वरूपाचा तात्त्विक विचार गेल्या लेखात केला. या विचारास जर महाराष्ट्रातील काही गुरुंच्या शिक्षणपद्धतींच्या तपशीलवार विवेचनास जोड दिली तर सगळाच विचार कदाचित अधिक नेमका होण्याची शक्यता आहे.

पण यात एक अडचण आहे. दीर्घ परंपरा असलेली इतर सामाजिक आचारसंहिता जशी लिखित स्वरूपात उपलब्ध असते वा एखाद्या चोखंदळ नियतकालिकाचे शैलीविषयक नियम कागदोपत्री उपलब्ध असतात तसे काही संगीतक्षेत्रातील गुरुपरंपरांबाबत नाही. 'गुरुमुखाने घेण्याची विद्या' या संगीत क्षेत्रातील रूढ प्रयोगात या विद्येत 'लिखापढीचा' भाग कमी असल्याचे सूचित होते. परिणामतः महाराष्ट्रातील आद्य संगीतगुरू बाळकृष्णबुवा वा अल्लादियाखां, अब्दुल करीमखां वा भास्करबुवा यांच्या शिक्षणपद्धतीला प्रत्यक्ष लिखित पुरावा काही उपलब्ध होणे शक्य नाही. या साऱ्यांच्या पद्धतींविषयी बरेच लिहिले गेले आहे हे खरे, पण हा अप्रत्यक्ष पुरावा झाला. यापेक्षा अधिक प्रत्यक्ष पुरावा म्हणजे आपल्यासमोर अजून जिवंत असलेल्या संगीतपरंपरा - म्हणजेच घराणी.

**घराण्याचे साम्य ब्रिटिश राज्यघटनेशी**

दुसऱ्या क्षेत्रातही उदाहरण घ्यावयाचे तर ब्रिटिश राज्यघटनेचे घेता येईल. ही राज्यघटना जशी एके ठिकाणी लिहून ठेवलेली सापडत नाही पण तिच्या अस्तित्वाचा व स्वरूपाचा निश्चित पुरावा न्यायालयांच्या निवाड्यांत वगैरे उपलब्ध असतो, त्याचप्रमाणे वेगवेगळया घराण्यांची संगीतशिक्षण संहिता जरी लिखित रूपाने उपलब्ध नसली तरी या संगीतपरंपरा जिथे जिथे व जेव्हा जेव्हा आविष्कृत झाल्या तिथे व तेव्हा त्यांनी आपापले अस्तित्व सिद्ध केले व पुढेही करतील.

घराण्यांच्या गायकीचे परिशीलन केल्याने गुरूंच्या संगीताभिरुचीवर प्रकाश पडेल हा आपला निष्कर्ष होय. कदाचित असा प्रश्न पडेल की घराण्यात अनेक गुरू असतात, व्यक्तिशः प्रत्येकाची शिक्षणपद्धती व तीमधून व्यक्त होणारी संगीताभिरुची वेगवेगळी असू शकते; तेव्हा एखाद्या घराण्याच्या विवेचनात त्यातील सर्व गुरूंना सरसकट लागू पडेल असा भाग कितीसा असणार? याच चालीवर असाही प्रश्न विचारता येईल की, वेगवेगळया घराण्यांच्या ज्या व्यक्तिभूत संगीताविष्कारांवरून आपण निष्कर्ष काढणार ते संगीताविष्कारही व्यक्तिगत कलावंत साक्षेप नसतील काय? कलावंत बदलला की आविष्कार बदलला व प्रत्येक कलावंताला नजर देणारा गुरूही वेगळा असू शकतो अशी जिथे परिस्थिती आहे तिथे सध्या उपलब्ध असलेल्या वा होत असलेल्या विविध घराण्यांच्या संगीताविष्कारावरून विशिष्ट घराण्याच्या गुरुत्वाबद्दल निष्कर्ष काढणे कितपत शक्य व योग्य आहे?

**सर्वांना एकत्र आणणारे तत्त्व**

या दोन्ही प्रश्नांना उत्तर आहे ते एकाच तत्त्वात. ते तत्त्व म्हणजे कुटुंबसाम्याचे तत्त्व. जरी एकाच घराण्यातील गुरू वेगवेगळे असले व एकाच गुरूचे शिष्यही भिन्न आविष्कार करीत असले तरीही त्या सर्वांना एकत्र आणणारी काही समान मूलतत्त्वे असतात. अब्दुल करीमखां, सवाई गंधर्व व भीमसेन जोशी हे तिघेही गुरू व गायक या दोन्ही भूमिकात वावरणारे. पण तिघांतही समान असे स्वरप्राधान्याचे तत्त्व त्यांच्या गायनात आढळते व त्यामुळे हे तिघेही एकाच गुरूपरंपरेतले आहेत, एकाच कुटुंबातले आहेत, एकाच संगीतदृष्टिकोणाचे पुरस्कार करणारे आहेत याचा प्रत्यय येतो. यामुळे सर्वांना लागू पडेल असे विवेचन शक्य आहे.

**एक अर्धसत्य**

घराण्यांविषयी संगीतक्षेत्रातल्या चर्चेत नेहमीच अभिमान, आवेश व आग्रह यांनी आपले सावट पाडल्याने बौद्धिक पातळीवर या गोष्टीचा विचार करणे हे जवळजवळ अशक्य झाले आहे. आपल्या इतर क्षेत्रांतील विचारांप्रमाणेच घराण्यांचा विचारही व्यक्तिनिष्ठेच्या पातळीवर आणून सोडल्यामुळे या संबंधीच्या बोलण्यास व लिहिण्यास वैचारिक नेमकेपणा येण्याऐवजी भावनिक धार आली आहे. अशा परिस्थितीत घराणे म्हणजे काय असे म्हटल्यावर फक्त एक गुरुपरंपरा नजरेसमोर येते तेव्हा ‘इतिहास म्हणजे थोर पुरुषांची चरित्रे’ या विधानात जेवढे सत्य आहे तितकेच ‘घराणे म्हणजे गुरुपरंपरा’ या विधानात आहे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या घराण्यांचा विचार म्हणजे वेगवेगळ्या गुरूंचा विचार नसून वेगवेगळ्या सांगीतिक तत्त्वांचा विचार हे सूत्र नजरेसमोर हवे. गुरू हे घराण्याचे प्रतिनिधित्व करतात. विशिष्ट, संपूर्ण सांगीतिक दृष्टिकोण असे घराण्याचे वर्णन केल्यास गुरू हे या दृष्टिकोणांची उदाहरणे होत. म्हणून गुरूंचा विचार आवश्यक. वारशाने गुरूमुखातून मिळालेला सांगीतिक दृष्टिकोण व वैयक्तिक भाष्य या दोन घटकांचा मिळून गुरू बनलेला असतो.

लेखाच्या सुरुवातीला म्हटले की गुरू या संस्थेच्या विचारात लिखित शिक्षणसंहितेचा आधार नसल्याने गुरू ज्या दृष्टिकोणाचे प्रतिनिधित्व करतात त्याचा विचार केला असता गुरूविषयीचा विचार नेमका व सुगम होईल. सर्व सांगीतिक दृष्टिकोण म्हणजे घराणी ही संगीतसिद्धीच्या अंतिम ध्येयानेच प्रेरित झाली आहेत. कलासंगीत सिद्ध करावयाचे यासाठी सांगीतिक विश्वाची अशी तपशीलवार रचना करावयाची की संगीतसंबद्ध सर्व गोष्टी एका विशिष्ट व्यापक चौकटीत अचूक बसतील हा प्रयत्न सर्वच घराण्यांचा असतो. परंतु काही वेळा घराण्यांचा उगम विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीने नियंत्रित होतो, कधी विशिष्ट गुरू घराण्याची मूळ चौकट बरीचशी कायम ठेवूनही तिला वैयक्तिक भाष्याने इतके गुदमरवून टाकतो की ती निरूपयोगी होते.

महाराष्ट्रात स्थूलमानाने ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा, किराणा या घराण्यांनी क्रमाने पाय रोवले असे म्हणण्यास हरकत नाही. महाराष्ट्राची संगीताभिरुची घडविण्यात या चार घराण्यांचा सिंहाचा वाटा आहे व या चारांचा विचार केला असता या संगीताभिरुचीच्या ठळक अंगांचा विचार झाला असे म्हणण्यास हरकत नाही.

ग्वाल्हेर गायकीने महाराष्ट्रात पाय आधी रोवले. या गायकीने आपली पुढील वैशिष्ट्ये नजरेस येतील अशा ठसठशीतपणे महाराष्ट्राच्या मनावर बिंबविली - १) साधी, सरळ गायकी. २) प्रचलित राग, प्रचलित ताल. ३) मध्यलयीची गायकी. महाराष्ट्रात या गायकीने मूळ धरले व या गायकीचे चाहतेही महाराष्ट्रात खूपच निर्माण झाले. गायनाविषयी जी काही आवड महाराष्ट्रात होती तिला एका 'गायकी'ची आवड असे यामुळे स्वरूप आले. गवई-गाण्याची गोडी महाराष्ट्रास या गायकीने लावली असे म्हणण्यास

हरकत नाही. तेव्हा या संदर्भात एकूण गायनकलेवरच या गायकीने मोठे उपकार केले यात शंका नाही. ही या गायकीची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाचीच झाली.

परंतु गायकी सरळच राखण्याच्या हट्टामुळे वक्र चलनाचे (मिश्र वा अनवट) राग भात्यात नसणे, मध्यलयीच्या सतत वापरामुळे रागाच्या प्रकृतीनुसार संथ आलापक्रिया अशक्य असणे व हिंदी भाषेच्या अपुऱ्या ज्ञानामुळे चीजा अशुद्ध असणे, एवढेच नव्हे तर नादाकृतीची एक चौकट पुरविण्याबाबतीत जरासा गोलमालपणा असणे ह्या ग्वाल्हेर गायकीच्या काही गवयांच्या मर्यादा होत्या. या मर्यादांची जाणीव नसल्याने ग्वाल्हेरचे संकेत हे संगीताचे अंगभूत नियम समजणारी श्रोत्यांची एक गर्दीच महाराष्ट्रात उसळली. साधेपणाचा सोपेपणा झाला, प्रचलित रागाच्या गायकीत तोचतोचपणा शिरला आणि मध्यलयीच्या यांत्रिक वापरामुळे संथ आलापच ग्वाल्हेरमध्ये नसतात असा समज रूढ झाला, आणि शब्दांना शब्द म्हणून महत्त्व संगीतात नसले तरी नादाकृती म्हणून त्याचे निश्चित स्थान असते हेही विसरले गेले. महाराष्ट्राच्या गायनात एक विलक्षण हरदासीपणा शिरला. यांत्रिक ठोकळेबाजपणा आला.

परंतु एकदा गायनाविषयी एखाद्या समाजात आस्था उत्पन्न झाली की संगीतविकासात असली तमोयुगावस्था फार काळ टिकू शकत नाही. जयपूर व आग्रा घराण्यांना उचलून धरण्याची महाराष्ट्राच्या इतिहासातील पुढची अवस्था हे याचेच द्योतक होय. या दोन्ही घराण्यांनी निरनिराळ्या तऱ्हांनी संगीतविकासास आलेला नीरसपणा दूर करण्याचा प्रयत्न केला. क्रियाशील असता वेगवेगळ्या घराण्यांनी संगीतविकास हा गतिमान व काही विशिष्ट आदर्शांना अभिमुख केला. पण या भरात सर्वच घराण्यांनी विशिष्ट गानांगावर भर देण्याबाबत जरा 'अति' केले. एकाने एक टोक तर दुसऱ्याने दुसरे असा काहीसा प्रकार केला. त्यामुळे संगीतविकासाची पुन:पुन्हा कोंडी झाली व ही कोंडी फोडण्याकरिता पुन:पुन्हा समग्र संगीतविश्वाचे साकल्याने पुनर्व्यवस्थितीकरण करणारे सांगीतिक दृष्टिकोण निर्माण होणे आवश्यक झाले.